विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०१९
प्रभावती वि. अशोक
नि.क्र.२५/ क (सोबत)

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.२</u>**

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत</u>**

१. दि.२४/१०/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी वादी प्रभावती यांच्या हक्कात ठरावपत्र करुन दिले होते. आता मला नि.क्र.४/१ वरील ठरावपत्र दाखवण्यात आले, ते माझ्यासमक्ष झाले असून त्यावर माझी सही असून वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे अंठ्याचे निशाण आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर ठरावपत्रास **नि.क्र.८४** देण्यात येते. तसेच दि.२४/१०/२०१९ रोजी प्रभावतीने प्रतिवादी क्र.१ यांना रु.५,५०,०००/- दिल्याबाबत पावती केली होती. आता मला नि.क्र.४/२ वरील पावती दाखवण्यात आले, ते माझ्यासमक्ष लिहीण्यात आले असून त्यावर माझी सही असून वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे अंठ्याचे निशाण आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पावतीस **नि.क्र.८५** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. व्ही. एस.पवार:-</u>**

प्रतिवादी क्र.१ व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.
सबब उलटतपास नाही.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे वकील श्री. एम.व्ही. पाटील यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

२. बिबराळ ते शिरुर अनंतपाळ यामधील अंतर ८-१० कि.मी. आहे. मी अपंग आहे. माझे १2वी पर्यंत शिक्षण झाले आहे. मी वादीच्या पतीस १०-१५ वर्षापासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या पतीसोबत माझी चांगली ओळख आहे. वादीच्या पतीस दोन ठिकाणी जमीन आहे. परंतु सदर जमिनीचे सर्वे नंबर मला माहीत नाहीत. सदर बैठक शिरुर अंनतपाळ येथे ०९-९.३० वा. सुमारास झाली होती. सदर बैठकीस मी, बसवराज चिकटे, प्रभावती व अशोक हे हजर होते. सदर बैठक अशोक यांच्या घरी झाली होती. अशोकचे घर प्रभावती यांच्या घराच्या पाठीमागच्या बाजूस आहे. शिरुर अनंतपाळ येथील एका प्लॉटची किंमत अंदाजे २०-२५ लाख रुपये असेल. अशोकची जमीन गावाच्या जवळ आहे याबाबत मला माहीत नाही. परंतु त्याची जमीन रस्त्यालगत आहे. प्लॉटची किंमत सहा लाख रुपये ठरली होती. सदर जमिनीची किंमत शासकीय किंमतीनुसार ठरली नव्हती. अंगद चिकटे हा वरवटी येथील रहिवासी आहे. हे म्हणणे खरे आहे की, अंगद चिकटे व मला वादीच्या पतीने बोलाविले होते. सदर ठरावाचा

व्यवहार हा शिरुर अनंतपाळ येथे तोंडी झाला व नंतर निलंगा येथे पूर्ण झाला. निलंगा येथे नोटरी असल्यामुळे आम्ही निलंगा येथे व्यवहार केला होता. सदर ठरावपत्रातील मजकूर अशोक यांनी सांगितला होता. अशोकचे शिक्षण किती झाले हे मला माहीत नाही. अशोकची व माझी पुर्वीची ओळख नव्हती. अशोकला बोलता येत नाही व त्याला काही समजत नाही याबाबत आमची चर्चा झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या पतीच्या सांगण्यावरुन मी पंच म्हणून सही केली आहे.

प्रतिवादी क्र.२ यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**

दि.०५/०९/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ हजर</u>

**<u>पुढील उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे वकील श्री. एम.व्ही. पाटील यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या घराची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, विवाद जमिनीच्या चतु:सीमा मला माहीत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, अशोक हा वेडा नाही.

**प्रश्न-** अशोक वेडा असल्यामुळे त्याच्या भावाची व पत्नीची संमत्ती घ्यावीशी वाटली नाही का?

**उत्तर-** अशोक वेडा नसल्यामुळे त्यांचा संमत्ती घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

दि.३१/१०/२०१९ रोजी दुय्यम निबंधक कार्यालयात मी, प्रभावती व अशोक मिळून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्याने आम्हाला अशोकचे मेडिकल सर्टीफिकेट मागितले होते व त्यामुळे खरेदीखत झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादातील ठरावपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी प्रभावतीने रु.५,५०,०००/- दिले नव्हते व त्यासंदर्भात रशिद पावती झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मित्राला जमीन मिळावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास – संपला. फेरतपास – नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**

दि.०९/०९/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.